# मी विठ्ठल पाहिला?

## वारी अनुभव - लेख क्र. 15

**- राजश्री कुलकर्णी (साऊथ ब्रुन्सविक, न्यूजर्सी)**

जुलै 2, 2014 बुधवार

**फलटण ते बरड 19.8 किमी.**

सकाळी गोडसेंकडे पहाटे चारला जाग आली. पाच वाजता तयार होऊन चहा घेऊन मुक्कामाच्या शाळेत आले. तोपर्यंत ताज्या बनवलेल्या पुऱ्या व साखरभाताची पाकिटं तयार होती. सगळ्यांना दुपारच्या जेवणासाठी पाकीटं देण्यात आली. 'देशमुख दिंडी'चं व्यवस्थापन जबरदस्त होतं.

सकाळी सहा वाजता चालायला सुरुवात केली आणि दहा वाजता मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचले. बरडजवळच एका शाळेत मुक्काम होता. बाजूला एका वेगळ्या दिंडीमधल्या लोकांचं भजन सुरू होतं. ते थोडावेळ ऐकलं. झाडाखाली, एका झाडाच्या पारावर बसून, पुऱ्या- लोणचं आणि साखरभात खाल्ला. तिथे बऱ्याच लोकांशी गप्पा मारल्या. नर्मदा परिक्रमा करणारे, श्री. सुरेश देशपांडे- ह्यांनी त्यांचे अनुभव सांगितले. एकनाथी भारूड म्हणणाऱ्या, जयश्री कुलकर्णी आल्या. त्यांना कित्येक गाणी तोंडपाठ होती. त्यांनी काही भारूडं म्हंटली. अक्षय धुमाळ आणि योगेश- या मुलांनी ब्लू-टूथद्वारे माझ्या फोनमध्ये 'हरिपाठ' आणि 'माऊली -माऊली' हे त्यावेळचं 'अजय-अतुल' यांचं लोकप्रिय गाणं मला डाउनलोड करून दिलं. कॉलेजला जाणारी ती चार मुलं इलेक्ट्रिसिटी आणि आवाजाची सोय करायचे. दुपारी माझी रोजनिशी लिहिताना प्रवासातल्या गोष्टी आठवल्या. वारीच्या प्रवासातला फिरता दवाखाना आठवला.







कितीतरी डॉक्टर्स, नर्सेस आणि स्वयंसेवक वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी सिध्द होते. या प्रवासात काहींच्या पायांना जखमा झाल्या होत्या, काही लोकांचे पाय मुरगळले होते. त्यांच्या सेवेला मालीश करणारे तज्ञ हजर होते. आशाताईंच्या पायालाही मालीश केल्यानंतर, त्यांना बरं वाटलं.



या प्रवासात अजून एक गंमत बघितली. प्रत्येक दिंडीमधे, हरिपाठ, इतर अभंग सांगणारा एक प्रमुख असायचा,

आणि त्याने एक ओळ म्हटल्यानंतर, दिंडीतील इतर लोक तीच ओळ परत म्हणायचे. दिंडीमधल्या प्रत्येकाला त्या ओळी नीट ऐकू याव्यात, म्हणून त्यांना अक्षरश: ओरडावं लागत असे. त्यामुळे त्यांचा घसा आतून सोलवटून निघत असावा. अशा लोकांच्या घशाला आराम मिळावा, म्हणून एक लाल रंगाचं



द्रावण ते प्यायचे. 'ते लाल द्रव' पिऊन बघण्याची खूप इच्छा होती, पण हिंमत झाली नाही. ते नक्की काय होतं, हे अजूनही कोडंच आहे.

'बरड'ला पाटणकर 'आजी-आजोबां'कडे आमची राहण्याची सोय होती. गावामधे त्यांचं, जुन्या प्रकारचं, पण



मोठं घर होतं. त्यांच्याकडे चहा घेतला. मस्त हवा सुटली होती. हवेतील शुध्दता जाणवत होती. रात्री वांग्याची भाजी-भाकरी हा बेत होता. नेहमीप्रमाणे रात्री झोपण्यापूर्वी आंघोळ केली. रात्री मस्त झोप आली. बरडला पोहोचल्यापासून तब्येतीची तक्रार नव्हती.

त्यानंतर बरड ते नातेपुते (21.2 किमी.), नातेपुते ते माळशिरस (19.5 किमी.), माळशिरस ते वेळापूर (17.2 किमी.), वेळापूर-बंडीशेगाव (20 किमी.) आणि बंडीशेगाव-पंढरपूर (14.2 किमी.) एवढाच प्रवास बाकी होता. यापैकी कुठल्याही गावात मुक्काम नव्हता. फलटणपासून माझ्या तब्येतीमधे आमूलाग्र बदल झाला होता. उत्सुकतेने पुढचा दिवस उजाडण्याची वाट पाहू लागले.

**जुलै 3, 2014 गुरुवार बरड-नातेपुते (21.2 किमी.)**

सकाळी 3 वाजता जाग आली. प्रात:र्विधी आटोपून पहाटे 4.30 वाजता चालायला सुरुवात केली; तेंव्हा स्त्री-पुरुषांचा एक छोटासा घोळका शांत-मधूर आवाजात, गात जाताना दिसला. भजनं ऐकताना खूप बरं वाटलं. लोक जास्त मनापासून गाताहेत, असं वाटलं. पहाटेची शांतता, लोक कमी, वर्दळ कमी आणि प्रदूषण कमी... अशा वातावरणात चालायला छान वाटत होतं.

वाटेतच चहा घेतला. महाराष्ट्र शासनाने वारकऱ्यांच्या

सार्वजनिक स्नानाची सोय गावोगावी केली होती. मीदेखील त्या पाण्यामध्ये भिजले, अन् परिसराचे काही फोटोजही काढले.



सकाळी 9वाजता धर्मपुरीला पोहोचले. जेवणाच्या विसाव्यासाठी थांबलो. तिथे नुकतेच अमेरिकेहून परतलेले श्री. धबडगावकर (वय वर्षे 84) भेटले. ते चाळीस दिवस अमेरिकेला राहून परत आले होते. अमेरिकेची त्यांची ही पहिली खेप होती. त्यांना अमेरिका खूप आवडली होती. अमेरिकेतील स्वच्छता सोडून मी वारीसाठी आले, हे ऐकून त्यांना माझं खूप आश्चर्य वाटलं.

दुपारी 12.30 वाजता हनुमानाच्या मंदिराच्या परिसरात जेवणं झाली. पुढचा प्रवासदेखील दिंडीसोबत केला नाही. त्यादिवशी विशेष ऊन नव्हतं. नातेपुतेच्या जवळ आलो तेंव्हा आभाळ भरून आलं होतं.



नातेपुतेला पोहोचल्यावर मुक्कामाची शाळेची जागा म्हणजे मोठ्ठा वाडाचा होता, व मध्यभागी चौक होता.

संध्याकाळी 6 ते 7 अण्णांचं प्रवचन होतं. अण्णांचं प्रवचन सुरू असताना मुसळधार पावसाची एक मोठ्ठी सर आली. वारी सुरू झाल्यापासूनचा ‘पहिला पाऊस’ होता तो! सगळ्या थकलेल्या जीवांना मृद्‌गंध उल्हसित करून गेला. **(क्रमश:)**